जनसामान्यांच्या मनातील आरसा
Postal Lic./AMT/RNP/492/2023-2025
वरुड | सोमवार
०८.१२.२०२५
# वरुड दर्पण
संपादक - चंद्रकांत भा. भड
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०६ | अंक: २७८ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
+91 7745067712

# फोडा आणि राज्य करा ही ब्रिटिशांची नीती होती

## वंदे मातरम शंभर वर्षाचे झाले तेव्हा देशभक्तांना जेलमध्ये टाकलं, संविधानाची गळचेपी झाली : पीएम मोदी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पंतप्रधान मोदींनी लोकसभेत वंदे मातरम दीडशे वर्ष झाल्याच्या निमित्ताने चर्चा सुरू केली. ते म्हणाले, 'या चर्चेत सत्ताधारी पक्ष किंवा विरोधी पक्ष नाही.



या सभागृहात आपल्या सर्वांसाठी वंदे मातरम, देशाच्या स्वातंत्र्य चळवळीला ऊर्जा देणारा आणि प्रेरणा देणारा आणि त्याग आणि तपश्चर्येचा मार्ग दाखवणारा मंत्र, घोषवाक्य, वंदे मातरमचे स्मरण करणे हा एक मोठा भाग्य आहे.' ते म्हणाले, 'वंदे मातरमला १५० वर्षे पूर्ण होत आहेत आणि आपण सर्वजण या ऐतिहासिक प्रसंगाचे साक्षीदार आहोत हे आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. वंदे मातरमला १५० वर्षे पूर्ण होत असताना आपण या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार आहोत हे आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

वंदे मातरम बंकिमचंद्रांनी ते १८७५ मध्ये लिहिले संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री सरकारच्या वतीने सहभागी होतील. मुख्य विरोधी पक्ष काँग्रेसच्या वतीने पक्षाचे सरचिटणीस प्रियंका गांधी आणि लोकसभेतील विरोधी पक्षाचे उपनेते गौरव गोगोई यांच्यासह आठ खासदार भाषणे देतील.

इतर पक्षांचे खासदारही भाषणे देतील. बंकिमचंद्रांनी ते १८७५ मध्ये लिहिले आणि ते आनंदमठमध्ये प्रकाशित झाले. वंदे मातरम, ७ नोव्हेंबर १८७५ रोजी अक्षय नवमीच्या शुभ प्रसंगी बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी लिहिले होते. ते पहिल्यांदा १८८२ मध्ये त्यांच्या 'आनंदमठ' या कादंबरीचा भाग म्हणून त्यांच्या 'बंगदर्शन' मासिकात प्रकाशित झाले. १८९६ मध्ये, रवींद्रनाथ टागोर यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात व्यासपीठावर वंदे मातरम गायले. राष्ट्रीय स्तरावर सार्वजनिकरित्या हे गाणे गायले जाण्याची ही पहिलीच वेळ होती. मेळाव्यात उपस्थित असलेल्या हजारो लोकांना अश्रू अनावर झाले.

आणीबाणीमुळे देशाला बेड्या ठोकण्यात आल्या होत्या पंतप्रधान म्हणाले, 'आणीबाणीमुळे देशाला बेड्या ठोकण्यात आल्या होत्या.' मोदी म्हणाले की, ही चर्चा केवळ सभागृहाची वचनबद्धता प्रकट करणार नाही तर जर आपण त्याचा सुज्ञपणे वापर केला तर भावी पिढ्यांसाठी शिक्षण म्हणूनही काम करू शकते.

आपण नुकताच आपल्या संविधानाचा गौरवशाली ७५ वा वर्धापन दिन साजरा केला. आज, देश सरदार पटेल आणि बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती देखील साजरी करत आहे. गुरु तेग बहादूर यांचा १५० वा शहीद दिवस. वंदे मातरमचा १५० वर्षांचा प्रवास अनेक टप्पे पार करून गेला आहे. जेव्हा वंदे मातरम पहिले ५० वर्षांचे होते तेव्हा देशाला गुलामगिरीत जगण्यास भाग पाडले गेले होते. जेव्हा वंदे मातरम पहिले १०० वर्षांचे होते तेव्हा देशाला आणीबाणीने बेड्या ठोकल्या होत्या.

# शिंदेंच्या शिवसेनेचे २२ आमदार भाजपच्या गळाला?

## आदित्य ठाकरेंच्या गौप्यस्फोटावर फडणवीसांचा पलटवार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नागपूर**– वंदे मातरम हे केवळ गीत नाही तर हे भारताच्या स्वातंत्र्याचा मंत्र आहे, हा राष्ट्रवादाचा मंत्र आहे. ज्या वंदे मातरमला गाताना भारताच्या कित्येक स्वतंत्रता सेनानी, क्रांतिकारी फाशीवर गेले परंतु उप तक नाही म्हटलं, हा तो महामंत्र आहे. या महामंत्राने सामान्य व्यक्तीला स्वतंत्रतेच्या आंदोलनाशी जोडलं, आता त्याचे दीडशे वर्ष पूर्ण झाल्यावर संसदेत चर्चा होणे स्वाभाविक आहे, असे म्हणत वंदे मातरमच्या संसदेतील चर्चेवरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केलं. तसेच, आदित्य ठाकरे यांनी वंदे मातरम घोषणेला बंदी केल्यासंदर्भात केलेल्या वक्तव्यावर उत्तरही दिलंय. वंदे मातरमवर कधीच बॅन लागलेला नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

आज आमच्या विधानसभेतही आम्ही लोकांनी संपूर्ण वंदे मातरम गाऊन या गीताला आमच्याकडून नमन केलं आहे, आणि पुढच्या अधिवेशनात आमच्या अध्यक्षांनी म्हटले आहे की, वंदे मातरमवर आमच्या विधानसभेतही चर्चा होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले. तसेच, वंदे मातरमच्या घोषणेवर बंदी घालण्यात आली आहे, आता फक्त भाजपचेच नारे द्यायचे का, देशाचा जयजयकार चालणार नाही का? असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले होते. त्यावरुन, आता मुख्यमंत्री फडणवीस यांनी पलटवार केला आहे.

वंदे मातरमवर कधीच बॅन लागलेला नाही, वंदे मातरमवर जे काही आघात झाले त्यासाठी काँग्रेसच जबाबदार आहे. आज त्याच काँग्रेससोबत गळ्याला गळा मिळवून आदित्य ठाकरे रोज फिरतात, त्यांनी भाजपला नाही तर काँग्रेसला प्रश्न विचारला पाहिजे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. तसेच, भाजपच्या कार्यकाळात वंदे मातरमचा नेहमीच सन्मान झाला आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, शिवसेना शिंदे गटाचे २२ आमदार भाजपात जाणार असल्याच्या आदित्य ठाकरेंच्या वक्तव्यावरूनही फडणवीसांनी पलटवार केला.याउलट शिवसेना मजबूत झाली पाहिजे त्यासाठी आम्ही त्यांच्या पाठीशी उभे आहोत आणि निश्चितपणे भविष्यात शिवसेना भाजप आणि आमची महायुती अजून मजबूत होताना आपल्याला पाहायला मिळेल, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## थोडक्यात

### चझडउ ने २१ डिसेंबरची पूर्व परीक्षा पुढे ढकलली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४८ नगरपंचायती निवडणुकीच्या मतमोजणीमुळे २१ डिसेंबर रोजीची एमपीएससी पूर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. त्यानुसार, नव्याने परी–क्षेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या असून ४ जानेवारी आणि ११ जानेवारी २०२६ रोजी परीक्षा होणार आहे. महाराष्ट्र गट–ब सेवा संयुक्त पूर्व परीक्षा आणि महाराष्ट्र गट–क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ अनुक्रमे ४ जानेवारी आणि ११ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात येत आहेत.

# ले-आऊटमध्ये दारु, गांजा व इतर मद्य सेवन करणाऱ्यांमध्ये वाढ

## नशेबाजांमुळे नागरिकांना सहन करावा लागतोय त्रास : आळा घालण्याची मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – एकीकडे बारमध्ये दारु पिणे महागडे ठरत असल्यामुळे आणि शासनाने बारमध्ये दारु पिणाऱ्या ग्राहकांवर मोठ्या प्रमाणात कर लावल्यामुळे शहरातील मोकाट जागांसह लेआऊटमध्ये मोठ्या प्रमाणात दारु पिणाऱ्यांची संख्या वाढली असुन यावर आळा घालण्याची मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून केल्या जात आहे. दरम्यान लेआऊटमध्ये दारु पिणारे केवळ दारुच नाही तर गांजा, अफू आणि इतर नशिलेबाज पदार्थांचे सुद्धा सेवन करत असल्याचे घटनास्थळावरून दिसून येत असून त्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणात नशिलेबाज पदार्थ सुद्धा मिळत असल्याचे दिसून येत आहे.



शहरात गेल्या काही दिवसांपासून लेआऊट आणि मोकळ्या जागेत अनेक ठिकाणी दारुच्या बॉटल्स, त्याला लागणारा सोबतचा चकना, पाण्याच्या रिकाम्या बॉटल्स, सिगारेटचे पॉकेट्स, बिड्यांसह काही नावीन्यपूर्ण वस्तु सुद्धा दिसून येत आहे, ज्यामध्ये गांजाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास येत असून वेगवेगळ्या प्रकारचे नशिलेबाज पदार्थ सुद्धा खुलेआमपणे मिळत असल्याचे बोलल्या जात असून यावर नियंत्रण घालण्याची गरज सुद्धा निर्माण झाली आहे.

एकीकडे नशा करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असताना वेगवेगळ्या प्रकारच्या नशा करण्याचे प्रमाण सुद्धा वाढले आहे. शहरात दारु पिणाऱ्यांची संख्या अधिक असतांना सोबतच गांजा, अफू आणि इतर अनेक नशिलेबाज पदार्थ सेवन करतांना अनेक नागरिक दिसून येत आहे. एकीकडे गांजा आणि नशिलेबाज पदार्थांवर शासनाचे निर्बंध असतांना हे सर्व वरुडमध्ये येथे कुठून? आणि त्याची विक्री करतो कोण? त्याचा शोध घेणे, सुद्धा क्रमप्राप्त आहे. या सर्व बाबींमुळे युवक वर्ग मोठ्या प्रमाणात नशा करीत असल्याचे दिसून येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील आयुर्वेदाचार्य डॉ.चरण सोनारे हे सातत्याने अनेकांना व्यसनमुक्तीकडे घेऊन जात असतांना व त्यांचे कार्य निरंतरपणे सुरु होत असतांना शहरात मिळणारी अवैध व्यसनाचे वेगवेगळे साधने आणि त्याकडे आकर्षिल्या जाणारा शहरातील तरुण वर्ग हा चिंतेचा विषय ठरला आहे. त्यामुळे यावर नियंत्रण मिळवणार तरी कोण? आणि अनेक नसलेले बाद पदार्थांना विक्री करण्याची मनाई असताना सुद्धा ते शहरात मिळते तरी कुठून आणि मिळत असतील तर मिळणाऱ्या वेगवेगळ्या पदार्थांवर कारवाई करणार तरी कोण? असा प्रश्न या निमित्ताने ठाकला आहे.

# जळगाव आर्वी लगतच्या मुख्य कालव्यात आढळला ३६ वर्षीय अपंग युवकाचा मृतदेह

## अद्याप अस्पष्ट : मृतदेह ग्रामीण रुग्णालयात

(चेतन परडखे)

**धामणगाव रेल्वे** – दि.५ डिसेंबर २५ रोजी सकाळी १० च्या सुमारास शेतकरी नरेश गावंडे यांना गंगाजळी शेत शिवारातील अप्पर वर्धाच्या मुख्य कालव्यात मृतदेह तरंगताना दिसून आल्याने एकच खळबळ उडाली.

सदर घटनेची माहिती दत्तापूर पोलीस प्रशासनाला देण्यात आली असता ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या सह कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. कालव्यात पाण्याचा प्रवाह जास्त प्रमाणात असल्याने मृतदेह काढण्यात मोठी कसरत करावी लागली. मात्र दत्तापूरचे एपीआय गजानन



गजभारे यांनी मोठ्या शिताफीने साहेबराव भोसले जळगाव आर्वी यांच्या शेतालगत असलेल्या कालव्यात उतरून मृतदेह बाहेर काढला. त्यानंतर मृतदेहाची ओळख पटली असून मृतक गजानन प्रल्हाद गडलिंग, वय– ३६ वर्ष, रा.तरोडा येथील असल्याचे निष्पन्न झाले. सदरची माहिती मृतकाच्या नातेवाईकांना देण्यात आली असून मृतकाचा भाऊ हा दिल्ली येथे राहत असल्याने मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात ठेवण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. यावेळी प्रामुख्याने दत्तापूरचे ठाणेदार गिरीश ताथोड, एपीआय गजभारे, बिट जमादार दीपक पंधरे, अभय जाधव, शेतकरी नरेश गावंडे हे उपस्थित होते. अपंग युवकाचा मृतदेह कालव्यात आढळून आल्याने सदरची घटना आत्महत्या कि, घातपात अद्याप कळू शकले नाही. प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या मार्गदर्शनात दत्तापूर पोलीस करीत आहे.



# जादूटोणा प्रतिबंधक कायद्यातील आरोपीची निर्दोष मुक्तता

## ॲड.अनिल बनसोड यांचा वरुड न्यायालयात प्रभावी आणि यशस्वी युक्तिवाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – अतिरिक्त सत्र न्यायाधीश-१ वरुड यांच्या न्यायालयाने फौजदारी अपीलमध्ये दिलेला निकाल आरोपींच्या बाजूने लागला असून जादूटोणा प्रतिबंधक कायद्याखालील आणि भा.दं.वि. कलम ५०४ व ५०६ अंतर्गत शिक्षा झालेल्या चार आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

या महत्त्वपूर्ण निकालामुळे क्रमांक २ ते ४, वाडेगाव येथील रहिवासी असून त्यांना कायदेशीर दिलासा मिळाला आहे. त्यांचे वकील ॲड.अनिल बनसोड यांच्या प्रभावी आणि यशस्वी युक्तिवादाने आरोपींना न्याय मिळवून देण्यात यश आले आहे.



**कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय झाला रद्द**

शिकायतकर्ता यांनी केलेल्या आरोपांनुसार, आरोपींनी त्यांना करणी (जादूटोणा) केल्याबद्दल शिवीगाळ केली, त्यांच्या गाईचे दूध आटवल्याचा आरोप केला आणि त्यांना कुऱ्हाड व काठ्यांनी मारण्याची धमकी दिली होती. या प्रकरणी, प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, वरुड यांनी १४ फेब्रुवारी २०२२ रोजी आरोपींना 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट आणि अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंधक व त्यांचे समूळ उच्चाटन अधिनियम, २०१३' च्या कलम २(ब), ३, अनुसूची ६ व ८ तसेच भा.दं.वि. कलम ५०४ आणि ५०६ सहकलम ३४ अंतर्गत दोषी ठरवून शिक्षा सुनावली होती.

**वरिष्ठ न्यायालयाची महत्त्वपूर्ण निरीक्षणे**

कनिष्ठ न्यायालयाच्या या निर्णयाला आव्हान देत आरोपींनी सत्र न्यायालयात फौजदारी अपील दाखल केले. अपीलार्थी क्र.२ ते ४ यांच्या वतीने ॲड.अनिल बनसोड यांनी प्रभावीपणे बाजु मांडली. न्यायालयाने पुराव्यांचे पुनरावलोकन केले आणि महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली:

**सत्र न्यायालयाचा अंतिम आदेश**

वरील सर्व बाबी विचारात घेऊन, अतिरिक्त सत्र न्यायाधीश १ यांनी २७ नोव्हेंबर २०२५ रोजी फौजदारी अपील मंजूर केले आणि १४ फेब्रुवारी २०२२ चा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय रद्द केला. न्यायालयाने क्रमांक १ ते ४ यांना सर्व आरोपांतून म्हणजेच महाराष्ट्र जादूटोणा प्रतिबंधक अधिनियम, २०१३ च्या कलम २(ब), ३, अनुसूची ६ व ८ आणि भा.दं.वि. कलम ५०४ व ५०६ अंतर्गत निर्दोश मुक्त केले आहे. आरोपींचे जामीनपत्र देखील मुक्त करण्यात आले आहेत. ॲड.अनिल बनसोड यांच्या कायदेशीर लढ्यामुळे, या महत्त्वपूर्ण जादूटोणा खटल्यात आरोपी क्रमांक २ ते ४ यांना सन्मानपूर्वक निर्दोष मुक्तता मिळाली आहे. हा निकाल कायद्याच्या योग्य अर्थबोध आणि पुराव्यांचे निष्पक्ष पुनरावलोकन यावर आधारित असल्याने त्याचे कायदेशीर महत्त्व अनन्यसाधारण आहे.

# एन.टी.आर.हायस्कूल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – एन.टी.आर.हायस्कूल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, न्याय व मानवतावादाच्या विचारांना वंदन करत महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम शाळेत अत्यंत श्रद्धाभावाने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक बरडिया होते. शाळेचे सचिव नेरकर, शाळेचे पर्यवेक्षक पाचघरे, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणुन राईकवार, ज्येष्ठ शिक्षक टाकरखेडे आणि ज्येष्ठ शिक्षिका फुटाणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन व हारार्पण करुन झाली. विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या कार्य, विचार आणि सामाजिक योगदानाचे दर्शन घडवणारी अर्थपुर्ण भाषणे सादर केली. प्रमुख वक्ते राईकवार यांनी संविधानिक मुल्यांची अनमोल उजळणी केली. त्यानंतर नेरकर यांचे मनोगत तसेच बरडिया यांचे अध्यक्षीय भाषण प्रेरणादायी ठरले. सर्व मान्यवरांनी बाबासाहेबांच्या विचारांची अंमलबजावणी हीच खरी आदरांजली असल्यावर भर दिला.

या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन संयम विटाळकर व सुयोग दंडाळे या विद्यार्थ्यांनी उत्तमरित्या केले तर आभार संयम विटाळकर या विद्यार्थ्याने केले व कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

## कला वाणिज्य व व्यवसायिक अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालय व माध्यमिक विद्यालयाच्या

# राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष श्रमसंस्कार व जनजागृती शिबीर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**लोणी** – कला वाणिज्य व व्यवसायिक अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालय व माध्यमिक विद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष श्रमसंस्कार व जनजागृती शिबीर ३० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२५ बेलोरा येथे उद्घाटीत झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन मनोहरराव पावडे उपस्थित होते. त्यांनी ग्रामीण समस्या, संवाद व स्वच्छता कार्यावर सखोल मार्गदर्शन केले. उदघाटनकर्ते लक्ष्मीकांत ताथोडे आणि प्रमुख अतिथी म्हणुन अजय काचरे, सतीश गोहाड, रणजीत पावडे, मंगला गोहाड, निर्मला पावडे, अमोल पाटील, चंद्रकांत ताथोडे, राजेंद्र ताथोडे, सुनिल घोरपडे, महेंद्र काचरे, आर.एन.फरकाडे, के.बी.पावडे आणि सर्वेश ताथोडे यांचेसह अनेक मान्यवर उपस्थित होते.



प्राचार्य एम.एम.रानोटकर, प्रा.एम.व्ही.वडनेरकर, के.आर.नेरकर, एल.व्ही.चिंचे, पी.डी.ब्राह्मणे, बी.पी.दारोरकर, वरलेस पवार आणि गौरव भुसाटे उपस्थित होते. एस.एम.दुर्योधन यांनी शिबिराच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन.एस.वडनेरकर तर शिबिराचे संचालन डी.एम.सावंत, आभार एम.आर.भालेराव यांनी मानले. हा शिबिर ग्रामीण भागातील तरुणांना स्वच्छता, श्रमदान आणि जनजागृतीसाठी प्रेरित करणारा कार्यक्रम ठरणार आहे, ज्याचा समुदायावर सकारात्मक परिणाम अपेक्षित आहे.

# नगर परिषद मराठी विद्यामंदिर क्र.१ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नगरपरिषद मराठी विद्यामंदिर क्र.१ येथे त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमात मुख्याध्यापिकांसह शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी डॉ.आंबेडकरांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन त्यांच्या स्मृतींना वंदन केले. यावेळी आयोजित कार्यक्रमात वक्त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याबद्दल आणि त्यांनी देशासाठी दिलेल्या योगदानाबद्दल माहिती दिली. त्यांच्या विचार आणि कार्यामुळे देशातील लाखो लोकांना नवी दिशा मिळाली, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.




या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका गीताई धुर्वे यांच्यासह शिक्षक दिनेश चव्हाण, वर्षा टिकस, हर्षा उंबरकर तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी गोपाल सोनुले, रेखा टिवसकर, सरिता कवटकर आणि शोभा टीकास उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी विशेष परिश्रम घेतले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व नवीन पिढीपर्यंत पोहोचविण्याचा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

# बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना सरकारी नोकरी देणार? वन विभाग मोठ्या निर्णयाच्या तयारीत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्या आणि वाघांच्या हल्ल्यांचे प्रमाण वेगाने वाढत असून अनेक नागरिकांचा जीव या हल्ल्यांत जात आहे. कुटुंबातील कर्ता पुरुष गमावलेल्या घरांची अवस्था बिकट होत असल्याने सरकार आता मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना वन विभागात सरकारी नोकरी देण्याच्या प्रस्तावाचा गंभीरपणे विचार करत आहे. वन विभागातील वरिष्ठ सूत्रांकडून याबाबत माहिती समोर येत आहे.

वन विभाग मोठ्या निर्णयाच्या तयारीत राज्यात मानवी जीवितहानी वाढत असल्याने राज्य शासन एक महत्त्वाच्या प्रस्तावाच्या विचाराधीन आहे. वाघ, बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास सरकार वन विभागात नोकरी देण्यासंदर्भात हा प्रस्ताव आहे.

## स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट सायन्स अँड आर्टस येथे

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**वरुड** – स्थानिक स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट सायन्स अँड आर्टस येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त एक विशेष कार्यक्रम उत्साहपुर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

भारतीय संविधानाचे शिल्पकार व सामाजिक परिवर्तनाचे महान पुरस्कर्ते असलेल्या डॉ.आंबेडकरांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी विद्यार्थी, शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो.डॉ.बी.एस.झरे होते तर प्रमुख अतिथी म्हणुन व्यावयायिक निळकंठ यावलकर, माधव बारमासे, प्रा.डॉ.पी.पी.पानसे आणि ग्रंथालयशास्त्र विभागप्रमुख प्रा.विजय ठाकरे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन करण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते केलेल्या दीपप्रज्वलनाने ज्ञान, समता आणि प्रबोधनाचा संदेश जणु सर्वांकडे पोहोचला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी दोन मिनिटे मौन पाळुन डॉ.आंबेडकरांना श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाचे संचालन निकिता भाकरे यांनी अत्यंत समर्थपणे पार पाडले.

या कार्यक्रमात विद्यार्थिनी चिन्मई सुफले, किरण कवटकर यांनी डॉ.बाबासाहेबांच्या विचारांवर आधारीत भाषणे केली. यावेळी निळकंठ यावलकर, माधवराव बारमासे, प्राचार्य प्रो.डॉ.बी.एस.झरे यांनी डॉ.आंबेडकरांच्या कार्याचा व्यापक आढावा घेत विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन प्रा.माधवी घोरमाडे यांनी केले. या उपक्रमाला बीएजेएमसी विभागप्रमुख प्रा.अमरदीप खाडे, बीबीए विभागप्रमुख प्रा.चेतन गणोरकर, बीसीए विभागप्रमुख प्रा.अनुप बेले, प्रा.सौरभ आकोटकर, प्रा.राहुल शिवारे, प्रा.आशिष शहाणे, प्रा.प्रफुल्ल बोहरुपी, प्रा.राजकुमार वानखडे, प्रा.चेतन ढोले, प्रा.आलिया खान, प्रा.संजीवनी बारस्कर, प्रा.साक्षी राठी, प्रा.अनुजा मडघे, प्रा.जान्हवी ढोले इत्यादी शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा निकाल जाहीर

# स्व.शिवरामजी हिवसे कॉलेजच्या ३ विद्यार्थिनी मेरीटमध्ये

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाला असून स्थानिक स्व.शिवरामजी हिवसे अध्यापक महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी अभूतपूर्व यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील तीन विद्यार्थिनींनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवुन महाविद्यालय व वरूड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये महाविद्यालयाची विद्यार्थिनी निलिमा पाटील हिने सहावे, कल्याणी केवटे हिने सातवे आणि प्रणाली टोगसे हिने आठवे स्थान पटकाविले आहे. या विद्यार्थिनींनी मिळवलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल संस्थाध्यक्ष नितीन हिवसे, सचिव विक्रम ठाकरे, संचालिका डॉ.प्राची ठाकरे, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य किशोर तडस यांनी सर्व गुणवंत विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे. तसेच महाविद्यालयातील प्रा.भारती ठाकरे, प्रा.राजू गोलाईत, प्रा.प्रियंका इंगोले, प्रा.सविता गलफड, प्रा.आरती देशमुख आणि प्रा.चेतना पाटील यांनी देखील यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. या निकालामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा पुन्हा एकदा सिद्ध झाला आहे.

# बेळगावात कर्नाटक विधानसभेचे हिवाळी अधिवेशन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**बेळगाव** – कर्नाटक विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाला आज बेळगावात सुरूवात होत असताना सीमाभागात पुन्हा एकदा तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. मराठी भाषिकांच्या दीर्घकालीन प्रलंबित प्रश्नांची दखल घेण्याची मागणी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीच जोरदारपणे व्यक्त केली जाते. परंतु या मागण्यांना थोपवण्यासाठी कर्नाटक सरकारकडून मुस्कटदाबी सुरु आहे. खानापूर महाराष्ट्र एकीकरण समितीच्या अनेक नेत्यांना पोलिस बंदोबस्तात ताब्यात घेण्यात आले.हा महामेळावा मराठी ओळख, हक्क आणि न्यायासाठीचा संघर्ष जिवंत ठेवणारा महत्वपूर्ण मंच मानला जातो.

# संपादकीय

## मनुपेक्षा मेकॉले चांगला!

स्थाभारतीय शिक्षणातील मागासलेपणाला केवळ मेकॉले कारणीभूत नव्हता. त्याची मुळं मनुस्मृतीच्या चार हजार वर्षांच्या शिक्षणबंदीमध्ये दडलेली आहेत. ब्रिटिशांनी शोषणासोबतच आधुनिकतेची दारे उघडली. आजच्या शैक्षणिक धोरणांत मात्र पुन्हा शिक्षणबंदीची सावली दिसू लागली आहे.

सत्तेच्या मदाने विद्याबंदी केली।
शुद्राती मानिली। बंदी सदा?
मनू तो जळाला, इंग्रजी वा आली।
ज्ञानाची माऊली। पान्हा पाजी?
- महात्मा फुले?

अलीकडेच, भारतीयांच्या मानसिक गुलामगिरीसाठी ब्रिटिशांना व मेकॉलेला जबाबदार धरण्यात आले आहे. या मानसिक गुलामगिरीतून पुढील १० वर्षांत मुक्त होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भारताची गौरवशाली शिक्षण परंपरा मेकॉलेने नष्ट केली आहे व आपण आपली भारतीय थोर शिक्षण व ज्ञान परंपरा विसरलो आहोत. या मानसिक मुक्तीसाठी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०?' तयार केले आहे?. असे अनेक विचार मांडण्यात आले आहेत. आपल्याकडे ही पद्धतच झाली आहे की, आपल्या सामाजिक दोषांबद्दल स्वतः आत्मपरीक्षण न करता इतरांना दोष देऊन स्वतःच्या गौरवाच्या बढाया मारायच्या! यामुळे सामाजिक अहंकार सुखावतो, हितसंबंध कायम राहतात, शोषण, विषमता लपवता येते! भारतात जातीव्यवस्था मोगलांच्या राजवटीत मुसलमानांनी निर्माण केली आहे असा नवा इतिहास लिहिला जात आहे, तर भारताच्या शैक्षणिक व ज्ञानपरंपरेला ब्रिटिश व मेकॉलेने उद्ध्वस्त केले, असे म्हटले जात आहे. ब्रिटिश वसाहत काळात मेकॉलेला शिक्षणामधून काळ्या रंगाचे, भारतीय वंशाचे पण विचाराने ब्रिटिश असे भारतीय कारकून निर्माण करायचे होते, हे खरे आहे! मेकॉलेला ब्रिटिश साम्राज्यवादाचे हितसंबंध राखणारे, स्वतंत्र विचार न करणारे, मानसिक गुलाम हवे होते हे १८३५ च्या मेकॉलेच्या 'मिनिट्स'मधून दिसून येते. पण हे अर्धसत्य आहे. मेकॉलेच्या आधी भारतात मानसिक गुलामगिरी निर्माण केली जात नव्हती व भारतीय शिक्षण प्रणाली थोर होती हे समजणे व पसरवणे हा 'कुतर्क' आहे. भारतात मानसिक गुलामगिरी निर्माण करण्याचा मनुस्मृतीचा, चातुर्वर्ण्याचा चार हजार वर्षांचा इतिहास आहे. त्यात मेकॉलेचा इतिहास फक्त २०० वर्षांचा आहे; पण याच काळात ब्रिटिशांच्या व मिशनऱ्यांच्या शाळांमधून 'स्त्रीशुद्रातिशुद्रांना' भारतात बुद्ध कालखंडानंतर शिक्षणाची संधी प्राप्त झाली. म्हणून 'गुलामगिरी' ग्रंथाच्या प्रस्तावनेत महात्मा फुले म्हणतात की, 'या देशात इंग्रज सरकार आल्यामुळे शूद्रातिशूद्र भटांच्या कायिक दास्यातून मुक्त झाले'. भारताच्या शिक्षणाचा इतिहास हा शिक्षणबंदी, शिक्षणमुक्ती, परत शिक्षण बंदी असा वळणावळणाचा आहे. चातुर्वर्ण्य परंपरेत ब्राह्मणांना व नंतर काही मर्यादेत क्षत्रियांनाच शिक्षणाचा जन्मजात अधिकार होता. स्त्रीशूद्रातिशूद्रांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. गार्गी, मैत्रेयी या फक्त अपवाद आहेत. एकलव्य, शबुक, कर्ण हे भारतीय शिक्षण प्रणालीचे वास्तव होते. गुरुकुलात ब्राह्मणेतरांना प्रवेश नव्हता. शिक्षण म्हणजे प्रामुख्याने धर्मग्रंथांचे पठण एवढाच अर्थ अभिप्रेत होता. त्यामुळे संस्कृत ही ज्ञानभाषा होती. ही ज्ञानभाषा शिकण्याचा अधिकार वरच्या जातींना होता.

**सुविचार**

**तुमच्या पहिल्या यशा नंतर अजिबात थांबू नका कारण जर तुम्ही दुसऱ्या प्रयत्नात अयशस्वी झालात तर पहिले यश हे फक्त नशिबामुळे मिळाले हे बोलायला लोक तयारच असतात.**

# कार्यकर्त्यांनी सत्तेबाहेरच राहायचे काय?

हि निवडणुकीत यश मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे मित्र आणि कार्यकर्ते अनेकदा सत्तेत वाटा मिळवताना दुर्लक्षित केले जातात. त्यामुळे रिपाइंचे प्रमुख कार्यकर्ते संतप्त होऊन ङ्गआम्हाला सत्तेत पुरेसा वाटा कधी मिळणार?असा प्रश्न उपस्थित करीत आहेत.

महाराष्ट्रात सध्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची धामधूम सुरू आहे. राज्यात महायुतीचे सरकार आहे. राज्याच्या सत्तेत महायुतीचे जे तीन भागीदार आहेत, त्यात रिपब्लिकन पक्षसुद्धा एक महत्त्वाचा घटक पक्ष आहे. राज्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत राज्यातले सत्तेतील प्रमुख तीन पक्ष एकमेकांच्या विरोधात लढताना दिसत आहेत. या रणधुमाळीत महायुतीतल्या मित्रपक्षांची एकमेकांच्या विरोधातली भाषणे गाजत आहेत. या निवडणुकांत मित्रपक्ष असणारे शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी हे पक्षदेखील परस्परांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी तर मुरबाडमध्ये मित्रपक्षाला रावण म्हटले आहे. एकनाथ शिंदेंचे नाव न घेता त्यांच्या पक्षाला रावणाची लंका म्हणून स्वतःच्या पक्षाला राम म्हणून टोकाची टीका करणारी भूमिका घेतली आहे. तळकोकणात सिंधुदुर्गात नारायण राणे यांचे एक सुपुत्र हे भाजपच्या विरोधात गेले आहेत. अनेक भागांत एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेना आणि भाजप हे एकमेकांच्या विरोधात लढत आहेत. काही ठिकाणी अजित पवार आणि शरद पवार या काका-पुतण्यांची एकजुट झालेली आहे. काही ठिकाणी उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि एकनाथ शिंदेंची शिवसेना एकत्र आली आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कोणतेही एक ठोस युतीचे चित्र नाही. कोणी कोणाशीही युती करत आहे. कशाचा कशाला थांगपत्ता नाही. राज्यात जे मांडीला मांडी लावून सत्तेचे लोणी खात आहेत, ते पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात शड्डू ठोकून उभे आहेत. एकमेकांना दूषणे देत आहेत. ही राजकारणातील बेदिली पाहून रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले हे संतप्त झाले. त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना पिंपरी चिंचवडमध्ये नाराजीचा सूर आळवला. ते म्हणाले की, 'रिपब्लिकन पक्षाला जागावाटपासाठी महायुतीतील मित्रपक्षांच्या मागे भीक मागत जावे लागत आहे. ही भीक मागण्याची वेळ रिपब्लिकन पक्षावर मित्रपक्षांनी आणली आहे.' हेच काय ते फल मम तपाला' असा सवाल सामान्य कार्यकर्ते विचारत आहेत.



निवडणुकांमध्ये रिपब्लिकन पक्षाला धोका देण्याची, फसविण्याची परंपरा ही फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. रिपब्लिकन पक्षाला जसा फुटीचा शाप आहे तसाच मित्रपक्षांच्या धोकेबाजीचाही शाप आहे. रिपब्लिकन पक्षाला निवडणुकांमध्ये धोका देण्याची परंपरा आहे. रिपब्लिकन पक्षाचा आणि रिपब्लिकन पक्षाच्या युतीच्या राजकारणाचा फार मोठा इतिहास आहे. रिपब्लिकन पक्षाची जी संकल्पना आहे ती या भारत देशाच्या संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतून साकार झालेला हा रिपब्लिकन पक्ष आहे. १९५४ मध्ये जेव्हा महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर भंडाऱ्याच्या पोटनिवडणुकीत लोकसभा निवडणुकीला उभे राहिले? त्यावेळी त्यांनी तत्कालीन अशोक मेहता यांच्या समाजवादी पक्षासोबत युती केली. ती युती पहिली राजकीय युती होती. त्या पहिल्या राजकीय युतीचा इतिहास आहे. अशोक मेहता जे समाजवादी नेते होते. अशोक मेहता आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मिळून युती करून ती निवडणूक लढवली. शेड्युल कॉस्ट फेडरेशनचे उमेदवार म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर निवडणूक लढत होते. समाजवादीचे नेते म्हणून अशोक मेहता निवडणूक लढत होते. त्यावेळेस डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जे भंडारा लोकसभा मतदारसंघात अनुयायी होते त्या सर्वांनी अशोक मेहता यांच्या समाजवादी पक्षाला भरभरून मतदान केले, मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मत देण्याची वेळ आली तेव्हा समाजवादी पक्षाचे अशोक मेहतांच्या समर्थकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मतदान केले नाही. त्याचा परिणाम असा झाला की, त्या पोटनिवडणुकीत महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पराभव झाला. हा पराभव आजही त्यांचे अनुयायी विसरलेले नाहीत. १९५४च्या भंडारा लोकसभा मतदारसंघात समाजवादीसोबत शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची झालेली युती आंबेडकरी चळवळीतील पहिली राजकीय युती ठरली आहे.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजवादी पक्षाशी केलेली युती ही आंबेडकरी चळवळीतील पहिली राजकीय मैत्री; राजकीय युती ठरली. त्या युतीला समाजवादी पक्षाने दिलेला धोका हा आंबेडकरी चळवळीला पहिला मित्रपक्षाकडून मिळालेला धोका ठरला आहे. समाजवादीसोबत झालेली शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची युती फोल ठरली होती. एक चांगला प्रयत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केला होता, मात्र मित्रपक्षाकडून त्यांना दाद मिळाली नाही. रिपब्लिकन पक्षाला मित्रपक्षाने धोका दिला, दगा दिला. या युतीच्या पहिल्या प्रयोगात रिपब्लिकन पक्षाला मित्रपक्षाकडून धोका मिळाला. तीच मित्रपक्षांची धोका देण्याची परंपरा पुढे दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षाला लाभली. त्यानंतर रा. सु. गवई यांच्या नेतृत्वात; त्यानंतर रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षाला ज्या ज्या मित्रपक्षासोबत रिपब्लिकनची युती झाली त्या त्या वेळेस मित्रपक्षांनी रिपाइंला निवडणुकांमध्ये धोका दिला. या देशाचे जे भाग्यविधाते आहेत, ज्यांनी या देशात लोकशाही रुजवली, मजबूत केली. ज्यांनी पंचवार्षिक निवडणूक आणून आपली संसदीय लोकशाही मजबूत केली.

त्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा लोकसभा निवडणुकीत २ वेळा पराभव झाला. मुंबईतील भायखळा लव्ह ग्रोव्ह मतदारसंघात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा झालेला पराभव आजही पिढ्यान?पिढ्या आंबेडकरी तरुणांच्या; आंबेडकरी चळवळीच्या हृदयावर भळभळणारी जखम ठरला आहे. ज्यांनी या देशाला लोकशाही शिकवली; ज्यांनी गुप्त मतदान पद्धत आणून एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य आणून खऱ्या अर्थाने राजकीय समता आणली, त्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पराभव काँग्रेसच्या चालबाजीतून आणि मतविभागणीतून झाला होता.

युती धर्म हा काँग्रेस पक्षानेही कधी पाळला नाही. त्यानंतरच्या काळात रिपब्लिकन पक्षाने ज्या पक्षासोबत युती केली त्या सगळ्या पक्षांनी रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांना निवडणुकीमध्ये फसवण्याचे; त्यांना दगा देण्याचे; त्यांचा विश्वासघात करण्याचे, त्यांच्या पाठीत खंजीर खुपण्याचे काम वेळोवेळी केले. तरीही नव्या पिढीच्या नेतृत्वाने रिपब्लिकन पक्षाच्या मतपेटीची मर्यादा पाहून मित्रपक्षांशी मैत्री करण्याचा निर्णय घेतला. राजकीय युतीचा कर्मवीर दादासाहेब गायकवाड, रा. सु. गवई, रामदास आठवले, प्रा. जोगेंद्र कवाडे आदी शीर्ष नेतृत्वाला जरी त्याचा लाभ होत राहिला तरी संपूर्ण चळवळीचा विश्वासघात मित्रपक्षाकडून सतत होत राहिला आहे. मित्रपक्षाकडून धोका देण्याची रिपब्लिकन पक्षाला लाभलेली परंपराच आहे.

मित्रपक्षाने रिपब्लिकन पक्षाला, उमेदवारांना धोका द्यायचा, ही कायम परंपरा राहिली आहे. अपवाद एकच आहे की, १९९८ मध्ये लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षासोबत जेव्हा एकीकृत रिपब्लिकन पक्षाची युती झाली. काँग्रेस पक्ष तेव्हा अखंड होता आणि त्याचे नेतृत्व महाराष्ट्रात शरद पवार करीत होते. रिपब्लिकन पक्षाचे त्या काळात ऐक्य झाले होते. त्या ऐक्यामुळे रिपब्लिकन पक्षाचे रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर, जोगेंद्र कवाडे, रा. सु. गव?ई हे सारे शीर्ष नेते लोकसभेत भरघोस मतांनी निवडून आले होते. हा एक अपवाद आहे तो रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्यामुळे! रिपब्लिकन ऐक्य झाले तर रिपब्लिकन चळवळीला कोणीही धोका देऊ शकत नाही. रिपब्लिकन पक्षाच्या पाठीत कोणी खंजीर खुपसू शकत नाही. रिपब्लिकन उमेदवारांना कोणी धोका देऊ शकत नाही.

# संचार साथी : 'बिग ब्रदर'चा डिजिटल अवतार

शि तंत्रज्ञानाच्या नावाखाली नागरिकांच्या खिशातच सरकारी खिडकी बसवण्याचा निर्णय, भारताला ऑरवेलच्या '१९८४'च्या सावलीत नेतोय का, हा प्रश्न समोर आलाय. 'संचार साथी'चे अनिवार्य हे अस्तित्वातील सुरक्षिततेपेक्षा अधिक पाळत आणि नियंत्रणाची भीती निर्माण करणारे आहे.

Big Brother is watching you.' हे जॉर्ज ऑरवेलच्या '१९८४' या जगप्रसिद्ध कादंबरीतील गाजलेले वाक्य आज पुन्हा कानात घुमू लागले आहे. पाळत, नियंत्रण आणि खासगी आयुष्याचा गळा घोटणारी सत्ता ही कधीकाळी फक्त कादंबरीतील दुनिया वाटायची. पण तंत्रज्ञान सत्तेच्या हातात गेले की, कल्पना वास्तवात उतरताना दिसते. आज भारतात हीच परिस्थिती प्रत्यक्षात आली आहे. आता देशात विकल्या जाणाऱ्या प्रत्येक नवीन स्मार्टफोनमध्ये 'संचार साथी' हे सरकारी ॲप आधीच डाऊनलोड केलेले आणि जुन्या फोनमध्ये अपडेटच्या माध्यमातून ते डाऊनलोड केले जाणार आहे. हे ॲप नागरिकांना काढूनही टाकता येणार नाही किंवा बंद करता येणार नाही, असा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. हा केवळ तांत्रिक आदेश नाही; हा आपल्या डिजिटल आयुष्याची दिशा ठरवणारा निर्णय आहे. 'संचार साथी' या ॲपचा वरकरणी उद्देश डिजिटल सुरक्षा आणि फसवणुकीला प्रतिबंध आहे. पण त्याच्या परवानग्या, त्याची माहिती गोळा करण्याची क्षमता आणि त्याचे अनिवार्य स्वरूप पाहिले की, हा सुरक्षा उपाय आहे की नागरिकांवर पाळत ठेवण्याचे सरकारी साधन आहे, असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही?

व्यक्तिगत फोनमध्ये सरकारी खिडकी? स्मार्टफोन हा नागरिकांच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. कॉल्स, मेसेजेस, लोकेशन, ब्राऊजिंग, बँकिंग यासह त्याचे संपूर्ण वैयक्तिक आयुष्य त्यात साठवलेले असते. अशा डिव्हाइसमध्ये सरकारनेच एक कायमस्वरूपी खिडकी बसवावी आणि ती बंद करण्याचा हक्क नागरिकांना नसावा, हे लोकशाही राज्यव्यवस्थेला शोभणारे नाही. 'संचार साथी' ॲप कोणते डेटा-पॉइंट्स गोळा करू शकते हे पाहिले तर त्यात लोकेशन, फोटो, व्हिडीओ, कॉन्टॅक्ट, सिम माहिती, डिव्हाइस आयडी, नेटवर्क ॲक्टिव्हिटी, कॉल-संबंधित मेटाडेटा यांचा समावेश आहे. आधार-मोबाईल-बँक या आधीच साखळीने जोडलेल्या व्यवस्थेत हे एक नवे पाळत ठेवणारे हत्यार ठरते. डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन कायद्याने सरकारला दिलेले अमर्याद अधिकार, त्यात 'राष्ट्रीय हित',




राष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र संबंध, आपत्ती व्यवस्थापन, गुन्हे तपास या अमर्यादित श्रेणी आणि त्यावर कोणताही प्रभावी स्वतंत्र रेग्युलेटर नसणे; यामुळे नागरिकांचा डेटा कोणत्या उद्देशासाठी वापरला जाईल, यावर कुठलेही नियंत्रण राहत नाही. लोकशाहीत सरकार नागरिकांवर विश्वास ठेवते. हुकूमशाहीत नागरिकांना सरकारवर विश्वास ठेवावा लागतो आणि सरकार नागरिकांवर पाळत ठेवते. यावरून भारताची वाटचाल कोणत्या दिशेने सुरू आहे स्पष्ट होते?

डिजिटल हेरगिरीचा इतिहास आणि वर्तमान या सरकारचा 'डिजिटल हेरगिरी'चा इतिहास नवीन नाही. नागरिकांच्या खासगीपणाला मूलभूत अधिकार म्हणून मान्यता देण्यास सरकारने विरोध केला. १० केंद्रीय एजन्सींना न्यायालयीन परवानगीशिवाय डेटा इंटरसेप्शनचे अधिकार दिले. डीएनए प्रोफाइलिंग बिल, सोशल मीडिया हब प्रकल्प, नमो ॲपचा डेटा परदेशात जाण्याचा आरोप आणि सर्वात महत्त्वाचे पेगासस स्पायवेअरचा वापर. पत्रकार, न्यायाधीश, निवडणूक अधिकारी, विरोधी पक्षांचे महत्त्वाचे नेते यांच्यावर पेगाससच्या माध्यमातून पाळत ठेवल्याचा आरोप आणि आता प्रत्येक फोनमध्ये सरकारी ॲप अनिवार्य ठेवण्याचा निर्णय हा त्याचे पुढचे पाऊल आहे.

भीमा-कोरेगाव प्रकरणात, सामाजिक कार्यकर्त्यांच्या संगणकात बाहेरून फाइल्स 'प्लांट' केल्या गेल्याचे आंतरराष्ट्रीय तपास यंत्रणांनी केलेल्या तपासात स्पष्ट झाले. पण याच खोट्या पुराव्याच्या आधारे अनेकांना चार-पाच वर्षे जेलमध्ये डांबण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर सरकारकडून मोबाईलमध्ये डाऊनलोड करण्यात येणाऱ्या कोणत्याही अनिवार्य ॲपवर नागरिकांनी विश्वास कसा ठेवावा.

"Google डेटा घेतं' हा युक्तिवाद चुकीचा का? सत्ताधाऱ्यांचा नागरिकांवर पाळत ठेवण्याच्या प्रकल्पाचे समर्थक 'ऋेसश्रश' तर डेटा घेतं. मग संचार साथीने डेटा घेतला तर काय अडचण आहे, असे प्रश्न विचारतात. पण ऋेसश्रश तुम्हाला अटक करू शकत नाही. ऋेसश्रश तुमच्या फोनमधील माहिती राजकीय कार्यासाठी वापरू शकत नाही. शासन संस्था मात्र कायद्याच्या जोरावर तुमचे जगणे मुश्किल करू शकते. तुमच्या डेटाचा वापर राजकीय फायद्यासाठी करत विरोधकांची चौकशी, खटले भरू शकते, कोणावरही दबाव आणू शकते. नागरिकांना सतत या भीतीच्या सावटाखाली, दहशतीखाली राहावे लागेल, हे अत्यंत धोकादायक आहे.

घर-घर ते हर मोबाईल आणि मोदी २०१४ मध्ये 'घर-घर मोदी' हा प्रचार नारा होता. त्यानंतर पेट्रोल पंप वितरणापासून कोविडच्या लसीचे सर्टिफिकेट ते थेट शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या खतांच्या गोण्यांपर्यंत, सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत दररोज विविध ठिकाणी नागरिकांना मोदींच्या फोटोचे दर्शन घडतच असते. आता त्याचे डिजिटल रूप म्हणजे प्रत्येक मोबाईलमध्ये संचार साथीच्या रूपाने होणार आहे. हा 'साथी' नसून डिजिटल हेर नागरिकांच्या आयुष्यात घुसवण्याचा प्रयत्न आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांच्या कार्यकाळात हेरगिरी झाल्याच्या आरोपांची बरीच चर्चा झाली.

वरुड दर्पण हे दैनिक पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून दैनिक वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

## करुणा बुद्ध विहार येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा परिनिर्वाण दिनी



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – करुणा बुद्ध विहार येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची ६९ वी महापरिनिर्वाण दिनी त्यांना अभिवादन करण्याकरीता त्यांचे शेकडो अनुयायी उपस्थित होते.

सर्व प्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आली. नागसेन महिला मंडळाने बुद्ध गीत व भीम गीत सादर करुन त्यांना आदरांजली वाहण्यात आली. या समयी करुणा बुद्ध विहारचे अध्यक्ष वामनराव हरले, सचिव अविनाश कुकडे, समता पर्वचे अध्यक्ष रमेश सहारे, प्रा.अश्वपाल वानखडे, हेमंत कुकडे, शुभांगी वानखडे, झाडे, अरविंद मागले, यांच्यासह मस्की, आकाश कुकडे, शामराव दंडाळे, जोगेंद्र दंडाळे, श्रावण शियाले, मेश्राम, पाटील, नागसेन महिला मंडळाचे अध्यक्ष अल्का नागले, वनिता हरले, सिमा हरले, उज्वला कुकडे, वंदना उभाळे, ज्योती कुकडे, अंजली झटाले, मेश्राम, धाडसे तसेच असंख्य महीला उपस्थित होत्या.

## ड्रीम एशिया वॉटर पार्क व ॲडव्हेंचर पार्क नागपूर येथे
## जनता इंग्लिश स्कूलची शैक्षणिक सहल



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – जनता इंग्लिश स्कूल येथील विद्यार्थ्यांसाठी मनोरंजनासोबत प्रत्यक्ष अनुभवातुन शिकण्याची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने नागपूर येथील ड्रीम एशिया वॉटर पार्क व ॲडव्हेंचर पार्कला शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली.

सहलीची सुरुवात सकाळी झाली. पारडशिंगा येथे विद्यार्थ्यांना गरमागरम नाश्ता देण्यात आला. ज्यामुळे मुलांचा उत्साह आणखी वाढला. यानंतर विद्यार्थ्यांनी वॉटर पार्कमधील विविध राईड्सचा मनसोक्त आनंद घेतला. सुरक्षितता, शिस्त आणि टीमवर्क याबाबत शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

वॉटर पार्कनंतर विद्यार्थ्यांना ॲडव्हेंचर ॲक्टिव्हिटीजमध्ये सहभागी होता आले. झिपलाइन, रोप ॲक्टिव्हिटी, नेट क्लायंबिंग, बॅलन्स वॉक यांसारख्या उपक्रमांमुळे मुलांमध्ये धैर्य व आत्मविश्वासाची वाढ झाली. सहलदरम्यान वेळ मिळाल्यावर विद्यार्थ्यांनी म्युझिकचा मनमुराद आस्वाद घेतला, गाणी ऐकत, नाचत त्यांनी वातावरण अधिक आनंदमय बनवले.

या संपुर्ण सहलीचे नियोजन व मार्गदर्शन शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री आंडे यांनी केले. विद्यार्थ्यांनी दिवसभर उत्साह, आनंद आणि शिकण्याचे क्षण अनुभवुन सहल अविस्मरण केली.

## तपोवनातील झाडं वाचवायला सयाजी शिंदे राज ठाकरेंच्या भेटीला, नाशिकमध्ये महत्त्वाची बैठक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – नाशिकमध्ये होऊ घातलेल्या कुंभमेळ्यासाठी तपोवनातील झाडं तोडण्याच्या मुद्द्यावरुन सध्या राजकीय आणि सामाजिक वातावरण प्रचंड तापले आहे. यामुळे सध्या नाशिकमध्ये मोठे जनआंदोलन उभे राहिले आहे. या वादात अभिनेते आणि सह्याद्री देवराई संघटनेचे सर्वेसर्वा सयाजी शिंदे यांनी उडी घेतली होती. त्यांनी तपोवनाला भेट देऊन वृक्षांची कत्तल करण्यास विरोध गेला होता. मात्र, या सगळ्यानंतरही राज्य सरकार साधूग्राम उभारण्यासाठी तपोवनातील झाडे कापण्याच्या निर्णयावर ठाम आहे. या पार्श्वभूमीवर



सोमवारी सयाजी शिंदे यांनी मनसेप्रमुख राज ठाकरे यांची भेट घेतली.

सयाजी शिंदे हे सोमवारी सकाळी मनसे चित्रपट सेनेचे अध्यक्ष अमेय खोपकर यांच्यासोबत राज ठाकरे यांच्या मुंबईतील शिवतीर्थ या निवासस्थानी आले. या दोघांमध्ये आता काय चर्चा होणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. नाशिकमध्ये मनसेनेही वृक्षतोडीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यामुळे आता वृक्षतोडीच्या मुद्द्यावरुन राज ठाकरे आणि सयाजी शिंदे एकत्र येऊन तपोवनातील लढा आणखी तीव्र करणार का, हे बघावे लागेल.

यापूर्वी सयाजी शिंदे यांनी तपोवनातील लहान झाडंही तोडता कामा नये, अशी भूमिका घेतली होती. साधू आले, गेले तरी त्याने काही फरक पडत नाही. याविषयी माझा अभ्यास नाही. पण झाडं गेली तर नाशिककरांचं नुकसान होईल. इथलं एकही झाड तुटता कामा नये. झाडं ही आपली आईबाप आहेत. आमच्या आईबापांवर हल्ला केला तर आम्ही मुलं काही इतकी बुळगी नाही. आमच्या आईबापांवर हल्ला केला तर आम्ही गप्प बसणार नाही.

## कौसल्या माखिजा यांचे निधन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरातील प्रतिष्ठीत व्यापारी माखिजा कुटूंबातील प्रमुख कौसल्या माखिजा यांचे नुकतेच वृध्दापकाळाने निधन झाले.

शहराच्या देशमुख वाडी परिसरातील श्री संत गजानन पतसंस्थेलगत वास्तव्यास राहत असलेल्या माखिजा कुटूंब प्रमुख कौसल्या



माखिजा यांचे आज सकाळी ८ वाजताचे सुमारास वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले. अत्यंत मृदभाषी कौसल्या यांचेवर शहरातील केदारेश्वर मोक्षधाम येथे आप्तेष्टांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांचे पश्चात मुलगा अशोक, कैलाश, ५ मुली, पुतण्या किशोर, नातु राकेश, अमित, रोशन, भरत, अजय, मनिष, सुना, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

## डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन



साजरा करण्यात आला. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य उपस्थितांपुढे मांडले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.तिलकचंद धोटे, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ.लुंबिनी गणवीर, महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, स्वयंसेविका उपस्थित होते.

## नरखेड तालुक्यातील रोहणा येथील सरपंचांना राष्ट्रीय सरपंच पुरस्काराने सन्मानित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नरखेड** – तालुक्यातील रोहणा येथील सरपंच नंदकिशोर धनराज गेडाम यांना राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय उत्कृष्टता सरपंच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दिल्ली येथे २६ नोव्हेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय संविधान दिनानिमित्त आयोजित भव्य सोहळ्यात केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मान जाहीर करण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्लोबल फाउंडेशन तर्फे दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारासाठी देशभरातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ५० सरपंचांची निवड झाली असून, त्यामध्ये नागपूर जिल्ह्यातून केवळ रोहणा

### नंदकिशोर धनराज गेडाम यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव



ग्रामपंचायतीचा सन्मान झाला.

दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया येथे पार पडलेल्या या पुरस्कार सोहळ्यात ग्लोबल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मनीष गवळी यांच्या हस्ते गेडाम यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व शाल–श्रीफळ प्रदान करण्यात आले. ग्रामीण विकास, पारदर्शक प्रशासन, डिजिटल ग्रामपंचायत, जलसंधारण, स्वच्छता अभियान तसेच ग्रामस्तरावर जनसहभाग वाढविण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत त्यांना हा राष्ट्रीय सन्मान देण्यात आला.

रोहणा ग्रामपंचायतीत गेडाम यांची विशेष कामगिरी: गावातील पाणीपुरवठा व्यवस्थेचे आधुनिकीकरण, स्वच्छ आणि सुंदर गाव अभियानाचे प्रभावी नियोजन, सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण व विद्युत व्यवस्था सुधारणा, शाळा परिसर विकास, सीसीटीव्ही स्थापनेद्वारे सुरक्षा वाढ, महिलांच्या बचत गटांना प्रोत्साहन आणि रोजगार निर्मिती, रस्ते, ड्रेनेज, पथदिवे आदी मूलभूत सुविधांमध्ये मोठी सुधारणा. या सर्व कामांमुळे नरखेड तालुक्यातील रोहणा गावाने आदर्श ग्रामपंचायतीचा मान मिळवला आहे. पुरस्कार स्वीकृतीनंतर गेडाम यांनी हा सन्मान रोहणा ग्रामस्थांच्या एकजुटीचा आणि माझ्या कार्यसंघाच्या परिश्रमांचा आहे. पुढील काळात आणखी विकासकामे राबविण्याचा संकल्प आहे, असे सांगितले. पुरस्कार जाहीर होताच रोहणा आणि परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. ग्रामपंचायतीचे सदस्य, युवक, महिला मंडळे आणि नागरिकांनी त्यांच्या या यशाचे स्वागत करून गावात जल्लोष केला. या पुरस्कारामुळे नरखेड तालुक्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्वल झाल्याचा अभिमान व्यक्त होत आहे.

## अंबाडा येथे भागवत महोत्सवाची सांगता

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अंबाडा** – नरखेड तालुक्यातील अंबाडा (सा)येथे दत्त जयंती निमित्त भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाची सुरवात २७ नोव्हेंबरला सुरवात करण्यात आली होती, दररोज सकाळी ध्यान प्रार्थना दुपारी भागवत कथा वाचन विविध भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम तसेच सायंकाळी सामुदायिक प्रार्थना, भारुड व आठ वाजतापासून भागवत कथा हभप रविंद्र महाराज काळमेघ यांचे मधुर वाणीतून झाले. शेवटी दत्तजयंतीच्या दिवशी भव्य शोभायात्रा निघाली होती समारोपाच्या दिवशी कल्याचे





कीर्तन ह भ प ओंकार महाराज झोड आळंदीकर यांचे करण्यात आले. शेवटी काटोल मतदार संघाचे आमदार.चरण ठाकूर मान्यवरांचे मार्गदर्शन देण्यात आले कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने करण्यात आली भागवत सप्ताह आयोजन समितीचे निरंजन कळसकर, लीलाधर भड, अनिकेत सातंगे, ऋषिकेश बेले, गोपाल सोनारे, मुरलीधर बेले व इतर गावातील तरुण मंडळीने मोलाचे सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी केला.

## धामणगावात महापरिनिर्वाण दिनानिमित्त सलग १६ वर्षांपासून रक्तदान शिबिराचे आयोजन

(संतोष वाघमारे)

**धामणगांवरेल्वे** – डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त धामणगांव रेल्वे येथे सलग १६ वर्षांपासून अखंडपणे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत असून, हा उपक्रम परिसरातील सर्वात मोठा, विश्वसनीय आणि प्रभावी समाजसेवेचा उपक्रम ठरला आहे. समाजासाठी काहीतरी उपयुक्त घडावे



या हेतूने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा वर्षागणिक उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

दरवर्षी शेकडो रक्तदाते या शिबिरात सहभागी होत असून, गरजू रुग्णांसाठी आवश्यक रक्तसाठा उपलब्ध करून देण्यात या उपक्रमाची मोलाची भर पडते. बाबासाहेबांच्या मानवतावादी विचारांनी प्रेरित होऊन समाजासाठी केलेला हा प्रयत्न आहे, असे आयोजकांनी सांगितले. नगरपरिषद प्रांगणात असलेल्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून शिबिराची सुरुवात करण्यात आली. रक्तदान शिबिरासाठी एकनिल ब्लड सेंटर, यवतमाळची टीम सागर रोडकर यांच्या नेतृत्वाखाली उपस्थित होती. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रविण हेंडवे, प्रशांत मुन, मंगेश सोनोने, ज्योती पाटील, सुनील ढाणके, प्रशांत नाईक, संजय तुपसुंदरे, आनंद राय, दादु मेश्राम, प्रेम मोटघरे, छगन जाधव, राहुल हाडे, शैलेश बोरकर, विलास पाटील, निलेश पाटील, डॉ.पंकज कवाडे, भिमराव सहारे, अजय तुपसुंदरे, राज वहिले, मिलिंद वाहिले, अमित फुलझेले, अल्पेश बनसोड, मंगेश भुजबळ, चेतन कोठारी, संदिप रामटेके, कोहिनूर श्रीरामे, बंडू मडामे, शुध्दोधन सोनोने, वैभव तुपसुंदरे, किशोर दहाट,जय मुळे, अमर खडसे, मुकुंद सोनोने, आर्यन सोनोने, अनुज सोनोने, शुभम सोनोने, शुभम हेंडवे, मेहुल मोहड, मयुर जांभुळकर, राजकुमार धाकटे यांनी अथक परिश्रम घेतले. धामणगांवच्या सामाजिक बांधिलकीची परंपरा जपणारा हा उपक्रम आता प्रेरणादायी ठरत असून, समाजसेवेचे जिवंत उदाहरण म्हणून ओळखला जात आहे.

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाणा | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |
| नाशिक | २६ | २२ |
| पुणे | ३० | २१ |

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्य विनम्र अभिवादन

## इर्विन चौक स्थित पुतळ्याला मानवंदना देऊन ज्ञानाच्या अथांग सागरास वाहीली आदरांजली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**अमरावती** – ६ डिसेंबर हा दिवस केवळ विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन नसून महामानवाच्या विचारज्योतीचा पुनर्जन्मदिन आहे.

हा दिवस मानवी स्वाभिमानाची, लोकशाही संस्कृतीची आणि सामाजिक परिवर्तनाची आठवण करून देणारा दिवस आहे. तो एका महामानवाच्या देहपरित्यागाचा भावनिक व दुःखद क्षण असला, तरी त्याच क्षणी त्याच्या विचारांचा जन्म होऊन परिवर्तन क्रांतीची अक्षय ज्योत प्रज्वलित झाली.

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींचा दिवस नसून, न्याय, समता, बंधुता आणि मानवतेच्या मूल्यांना नव्याने जागवणारा दिवस आहे. हा दिवस भारतीय समाजाला आत्मचिंतनाची, जागृतीची आणि कृतज्ञतेची साक्ष देणारा 'महापरीनिर्वाण दिन' म्हणून साजरा केला जातो. महापरीनिर्वाण दिन हा स्मरणाचा नाही, तर संकल्पाचा दिवस आहे. आज शनिवार दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अमरावती जिल्हा-शहर व राष्ट्रवादी युवक काँग्रेस च्या वतीने ज्ञानाच्या अथांग सागरास विनम्र अभिवादन करण्यात आले.
यावेळी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हारार्पण करून महामानवाच्या सामाजिक परिवर्तनाच्या लढयाचे व संविधान निर्मितीच्या बहुमोल कार्याचे स्मरण करीत श्रद्धापुर्वक आदरांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर-जिल्हाध्यक्ष प्रशांत डवरे, माजी महापौर- अँड.किशोर शेळके, अमरावती महानगरपालिका स्थायी समितीचे माजी सभापती – अविनाश मार्डीकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष – ऋतुराज राऊत, मनीष बजाज, भोजराज काळे, अँड.सुनील बोळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस विधानसभा अमरावती अध्यक्ष- प्रमोद धनाडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष आकाश हिवसे, प्रदेश सचिव मयूर झानबानी, राष्ट्रवादी काँग्रेस व्हीजे/एन्टी सेल बडनेरा अध्यक्ष – भास्कर ढेवले, राष्ट्रवादी युवक अल्पसंख्यांक विभाग अध्यक्ष- मोईन खान, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहराध्यक्ष – संकेत बोके, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अमरावती शहर प्रसिद्धी प्रमुख – अमित तायडे, निलेश वडे, अविनाश पारडे, प्रशांत पेठे, शैलेश अमृते, प्रकाश मोहोड, प्रथमेश गवई, संकेत महल्ले, राहुल इंगळे, आशिष कपले, सारंग देशमुख, सागर इंगळे, अभिजित लोयटे, रोहन तायडे, मनीष पेठे, सारंग देशमुख. अमन गुडधे, हर्षल रोंघे, शिवराज पाटील, सोमेश रोहणकर, आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा-शहर तसेच राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे पदाधिकारी व सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते. भीमराया. घे तुझ्या या लेकरांची वंदना जब तक सुरज चांद रहेगा बाबा तेरा नाम रहेगा.. अशा शब्दातून ज्ञानाच्या अथांग महासागरास मानवंदना अर्पण करण्यात आली.

नरखेडमध्ये नाफेडच्या सोयाबीन खरेदी हंगामाचा शुभारंभ

# आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या हस्ते विधिवत उदघाटन

## शेतकऱ्यांच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नरखेड** – येथील शेतकी खरेदी-विक्री संघात नाफेडच्या सोयाबीन खरेदी हंगामाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात आणि शेतकऱ्यांच्या प्रचंड उपस्थितीत पार पडला. काटोल विधानसभा क्षेत्राचे आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या हस्ते याचा विधिवत शुभारंभ संपन्न झाला. सोयाबीन खरेदीसाठी यावर्षी एमएसपी ५३२५ रुपये प्रति क्विंटल इतका दर निश्चित असून, प्रारंभीच मोठ्या प्रमाणात शेतकरी सोयाबीन विक्रीसाठी दाखल झाले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार ठाकूर यांच्यासह माजी सभापती राजू हरणे, शेतकी खरेदी विक्रीचे सभापती घनश्याम ठाकरे, उपसभापती ओंम खत्री, संचालक हिम्मत नखाते, लोकेश काळे, भागवत भिसे, मनोज कोरडे, दिलेश ठाकरे, श्यामराव बराई, सुदर्शन नवघरे, सुरेश शेंद्रे, राजेश क्षीरसागर, गोपाल टेकाडे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते आणि असंख्य शेतकरी उपस्थित होते. सोयाबीन खरेदी केंद्र सुरु झाल्याने शेतकऱ्यांमध्ये दिलासा निर्माण झाला असून व्यापाऱ्यांकडून होणारा दरतोड व्यवहार टळण्यास मदत होणार असल्याचे शेतकऱ्यांनी नमूद केले.यावेळी शेतकी खरेदी-विक्री संघाचे संचालक हिम्मत नखाते, लोकेश काळे आणि भागवत भिसे यांनी आमदार ठाकूर यांना नाफेडअंतर्गत मका खरेदीही नरखेडमध्ये सुरु करावी अशी मागणी असलेले निवेदन सादर केले. या मागणीवर आमदार ठाकूर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, पुढील दोन ते तीन दिवसांत हा प्रश्न मार्गी लावण्याचा मी वैयक्तिक पाठपुरावा करेन, असे आश्वासन देत शेतकऱ्यांना दिलासा दिला. शुभारंभ कार्यक्रमात सोयाबीन खरेदीदरम्यान पारदर्शकता, काटेकोर तपासणी, त्वरित वजन प्रक्रिया आणि शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभी केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. दररोज मोठ्या प्रमाणावर खरेदी होण्यासाठी कर्मचारी, ट्रॅक्टर-ट्रॉली रांगा आणि वजन काट्यांची व्यवस्था सुदृढ करण्यात आली आहे.

नाफेडची खरेदी सुरू झाल्याने नरखेड तालुक्यातील शेतकरी वर्गात समाधानाची भावना असून, येत्या काही दिवसांत खरेदीला आणखी गती देण्याचा शेतकी संघाचा मानस आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनस्तरावरून आणि स्थानिक प्रतिनिधींकडून होणारा हा प्रयत्न म्हणजे नरखेड तालुक्यातील कृषी अर्थव्यवस्थेला मिळालेले बळ असल्याचे मान्यवरांनी व्यक्त केले.

# तुकाराम मुंढेंच्या समर्थकांकडून भाजप आमदाराला धमकी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नागपूर–** सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याविरोधात भाजप आमदार कृष्णा खोपडे लक्षवेधी मांडणार असल्याचे वृत्त झळकताच खोपडे यांना फोनवरून धमकीचे कॉल आल्याची माहिती. खोपडे यांच्यासंदर्भातील वृत्त एबीपी माझाने सर्वप्रथम दिले होते, ही बातमी झळकताच अधिवेशनासाठी नागपूर येथे असलेल्या खोपडे यांना धमकीचा कॉल आल्याचे त्यांनी एबीपी माझाशी बोलताना सांगितले. आम्ही तुकाराम मुंढे यांचे समर्थक आहोत असे सांगून दोघांनी पाहून घेण्याची धमकी देत फोनवरुन इशारा दिला आहे. राज्यातील प्रसिद्ध आणि बदलीमुळे सातत्याने चर्चेत असलेले आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या विरोधात हिवाळी अधिवेशनात भाजप आमदार विशेष लक्षवेधी सूचना मांडून त्यांना निलंबित करण्याची मागणी करणार असल्याची माहिती आहे. तुकाराम मुंढे नागपुरात महापालिकेचे आयुक्त असताना त्यांनी कोणतेही अधिकार नसताना आणि शासनाकडून त्यांची 'स्मार्ट सिटी प्रकल्प'चे मुख्य कार्यकारी अधिकारी पदी नेमणूक नसतानाही त्यांनी स्मार्ट सिटी प्रकल्पाचा प्रभार नियमबाह्य पद्धतीने आपल्याकडे घेतला होता, असा आरोप भाजपाचा आहे.

# कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सतर्फे 'स्वदेशी जनजागृती रथ' धामणगांव तहसीलमध्ये व शहरात दाखल

( संतोष वाघमारे)



**धामणगांवरेल्वे** – कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स द्वारा संपूर्ण भारतात स्वदेशी स्वीकारून देशाला आत्मनिर्भर बनविण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या स्वदेशी जनजागृती रथाचे आज धामणगाव तहसीलमध्ये आगमन झाले.

स्थानिक गांधी चौकात या रथयात्रेचे उत्साहात स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचे स्थानिक पदाधिकारी तसेच भारतीय जनता पक्षाचे नेते व भावी नगराध्यक्षा डॉ.अर्चना रोठे (अडसड), विधानसभा प्रमुख रावसाहेब रोठे, भावी नगरसेवक गिरीष मुंदडा, विदर्भ उपाध्यक्ष गिरीष भुतडा, तालुका अध्यक्ष संजय जांगडा, महिला विंग अध्यक्षा राधा भूत, तसेच लक्ष्मीकांत वर्मा, प्रेमकुमार टावरी, अशोक भंडारी, मनोहर कांकरिया, प्रवीण बंब, सतीश कांकरिया, दीपक राठी, प्रशांत भंडारी, लाला मुंधडा, गोपाल भूत, दीपक केला, तरुण मुंधडा, संजय वर्मा, राजेश जांगडा, अशोकजी आसावा यांसह मोठ्या संख्येने व्यापारी व पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून करण्यात आली. त्यानंतर विविध वक्तयांनी उपस्थित नागरिक व व्यापाऱ्यांना स्वदेशी वस्तूंचा प्रसार करून आत्मनिर्भर भारत निर्मितीसाठी योगदान देण्याचे आवाहन केले. उपस्थितांनी स्वदेशी उत्पादने वापरण्याचा व प्रोत्साहन देण्याचा संकल्प व्यक्त केला.

तसेच स्थानिक भगतसिंग चौकातही या रथयात्रेचे स्वागत करण्यात आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख चंद्रशेखर राठी, अशोक भंसाली, दर्शन राठी, बालूभाऊ धुर्वे, शेखर पाटील तसेच CAIT चे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत अमर शहीद भगतसिंह यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून स्वदेशी संकल्प रथयात्रेला अभिवादन करण्यात आले.

# श्री संत लहरी बाबा पुण्यतीथी महोत्सवाचे भव्य आयोजन

## श्री संत गजानन महाराज मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशरोहन

(चेतन परडखे)



**धामणगाव रेल्वे** – तालुक्यातील तीवरा गावा मधे श्री संत परमहंस ब्रह्मानंद लहरी बाबा यांच्या ४६ व्या पुण्यतिथीनिमित्त दिनांक ९ ते १६ डिसेंबर २०२५ दरम्यान मोठे भक्ती भावाने साजरा होणार आहे.

विदर्भातील प्रत्येकाच्या हृदयात बसलेले श्री संत परमहंस लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सवाला सुरुवात होणार असून सात दिवस भागवत व कीर्तनाचे आयोजन केलेले आहे.

दरवर्षी तीवरा गावामध्ये श्री संत लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सव साजरा करण्यात येतो. उद्या मंगळवार ला सकाळी दहा वाजता श्री संत लहरी बाबा यांच्या प्रतिमेची पूजन व कलश स्थापना होईल.

दररोज सात दिवस प पू.: आचार्य स्वामी गजेंद्र चैतन्य जी महाराज यांच्या वाणीतून संगीतमय भागवत राहणार आहे. सकाळी ग्रामसफाई व गावकरी भजन मंडळाच्या वतीने काकड हरिपाठ सामुदायिक प्रार्थना राहणार आहेत तसेच त्यामध्ये शनिवार दि.१३ रोजी निशुल्क रोग निदान शिबिर राहणार आहे तसेच मंगळवार दि.१६ रोजी होम पूजा व काल्याचे किर्तन प. पू. आचार्य स्वामी गजेंद्र चैतन्यजी महाराज यांच्या वाणीतून होणार आहे.

या दिवशी दुपारी महाप्रसाद व सायंकाळी दिंडी महोत्सव आयोजित केला असून यात विदर्भातील नामवंत दिंड्या सहभागी होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन तिवरा गावातील ग्रामस्थांनी केली आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील जे.एस.ठाकरे मॅडम, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.१००२/२०२५** **ने.ता.१०/१२/२०२५**

**अर्जदार :-** १) रामचंद्र सखारामजी बालपांडे, वय अं.६७ वर्ष, धंदा-शेती, रा.शेंदुरजनाघाट, २) आशा गणपती खुरसंगे, वय अं.५० वर्ष, धंदा-घरकाम, रा.पांढुर्णा, ता.जि.पांढुर्णा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **सखाराम जागोजी बालपांडे व मयत विठाबाई सखारामजी बालपांडे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१०/१२/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१७/१०/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील जे.एस.ठाकरे मॅडम, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.११०४/२०२५** **ने.ता.१७/१२/२०२५**

**अर्जदार :-** १) नंदकिशोर विष्णुजी मेंढे, वय अं.४७ वर्ष, धंदा-मजुरी, रा.शेंदुरजनाघाट, २) प्रमिला अरुणराव बरडे, वय अं.६० वर्ष, धंदा-घरकाम, रा.वर्धामनेरी, ता.आर्वी, ३) सौ.मंगला किशोरराव चौधरी, वय अं.५३ वर्ष, धंदा- घरकाम, रा.वरुड, ता.वरुड, ४) श्रीमती करुणा गजाननराव चोपडे, वय अं.४९ वर्ष, धंदा- घरकाम, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत विष्णु लहानुजी मेंढे व मयत कमला विष्णुजी मेंढे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/१२/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०६/११/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# बेनोडा (शहीद) पोलिस स्टेशनच्या हद्दीत अवैध व्यवसाय जोरात

## ठाणेदारांचे दुर्लक्ष : जिल्हा पोलिस अधिक्षकांनी लक्ष देण्याची मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**वरुड** – जिल्हा पोलिस अधिक्षकांसह वरिष्ठ अधिकारी कितीही अवैध व्यवसाय बंद असल्याचे सांगत असले तरी सुध्दा शहिदांची भुमि असलेल्या वरुड तालुक्यातील बेनोडा (शहीद) पोलिस स्टेशन अंतर्गत अनेक गांवामध्ये वरली मटका व गावठी दारुची विक्री मोठ्या प्रमाणात सुरु असल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहे. याबाबत नागरिकांकडून ठाणेदार विवेक देशमुख यांचेकडे अनेकांनी माहीती दिली परंतु त्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करुन माहीती देणाऱ्यालाच दमदाटी केल्या गेली त्यामुळे नागरिकांनी प्रसिध्दीमाध्यमांकडे धाव घेतली व अवैध व्यवसायांबाबतचे पुरावे प्रसिध्दीमाध्यमांना सादर करुन वरिष्ठांनी याकडे लक्ष देऊन सर्वसामान्यांना न्याय मिळवुन देण्याची मागणी केली आहे.

जिल्हा पोलिस अधिक्षक म्हणुन विशाल आनंद रुजू झाले तेव्हापासून संपूर्ण जिल्ह्यात अवैध व्यवसायांवर मोठा अंकूश ठेवण्यात ते यशस्वी झाल्याची चर्चा सुरु असतांनाच बेनोडा (शहीद) पोलिस स्टेशन अंतर्गत अवैध व्यवसायांनी पुन्हा डोके वर काढले असून आतापर्यंत पुर्णत: बंद असलेला वरली मटका आणि गावठी दारु खुलेआमपणे या पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या गाडेगांव, लोणी, खडका, जामगांव, हातूर्णा, वाडेगाव, काटी, मांगरुळी (पेठ), इत्तमगांव, सांवगासह मध्यप्रदेशालगत असलेल्या गावांमध्ये सुरु आहे. गेल्या आठवड्यात प्रसिध्दीमाध्यमांच्या प्रतिनिधींनी १० रुपयांची वरली लावुन रितसर पावती घेतली तर काही गावांमध्ये गावठी दारु कॅरी बॅगमध्ये पॅक केलेली सुध्दा विक्री केल्याचे आढळून आल्याने बेनोडा पोलिस स्टेशन अंतर्गत अनेक गावांमध्ये अवैध व्यवसाय सुरु असून हे सर्व अवैध व्यवसाय ठाणेदार यांचेच आशिर्वादाने सुरु असल्याचे गावातील नागरिकांचे म्हणणे आहे. जिल्हा पोलिस अधिक्षक विशाल आनंद, उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खांडेकर यांनी स्वत: धाडी घालुन अवैध व्यवसायिकांवर कठोर कार्यवाहीची मागणी केली आहे. स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये बेनोडा या गावाचे नांवे बेनोडा (शहीद) म्हणुन घेतले जाते. या पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या इत्तमगांव, लोणी, बेनोडा, पळसवाडा या गावातून सुध्दा मोठ्या प्रमाणात शहीदांनी या देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वत:च्या प्राणाची आहूती दिली, असे असतांना या पोलिस स्टेशन अंतर्गत अवैध व्यवसाय सुरु राहावे, याबाबत आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अवैध व्यवसायिकांवर वचक निर्माण करण्यासाठी थेट प्रत्येक गावांमध्ये धाडसत्र राबवुन त्यांचेवर कार्यवाही करावी जेणे करुन जिल्हा पोलिस अधिक्षक अवैध व्यवसाय बंद असल्याबाबतचा गवगवा करीत आहे, ते उघड होवुन खरे काय? ते समोर येईलच, अशी आशाही ग्रामस्थांकडून व्यक्त केल्या जात आहे.

> “ गेल्या काही दिवसांपुर्वीच ठाणेदार म्हणुन विवेक देशमुख रुजु झाले, एक तरुण आणि संयमी ठाणेदार म्हणुन त्यांची ओळख आहे त्यामुळे या परिसरातील अवैध व्यवसायावर पोलिसांचे नियंत्रण राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात असतांना ठाणेदार देशमुख हे सर्वसामान्यांचे कॉल रिसिव्ह करीत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे असून आम्ही तक्रार करायची तरी कोणाकडे? असा प्रश्न सर्वसामान्यांकडून विचारला जात आहे.

> “ जिल्हा पोलिस अधिक्षक विशाल आनंद हे अतिशय शिस्तप्रिय अधिकारी म्हणुन परिचीत आहेत. अवैध व्यवसायावर नियंत्रण मिळविण्याकरीता जिल्हा पोलिस अधिक्षकांनी एक विशेष टिम सुध्दा नियुक्ती केली आहे, अशा स्थितीत या टिमने किमान काटी, वाडेगांव, लोणी, पेठ, वघाळ, हातुर्णा, मांगरुळी या परिसरात फेरफटका जरी मारला तरी खुलेआमपणे अवैध व्यवसाय सुरु असल्याचे दिसुन येतील, असे सर्वसामान्य नागरिकांचे म्हणणे आहे.

> “ राज्य उत्पादन शुल्क विभाग सुध्दा केवळ वसुलीमध्ये मग्न असुन अवैध दारु विक्रीवर निर्बंध ठेवण्याचे कार्य हे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे असतांना या विभागाच्या वतीने एका वसुली प्रतिनिधीची नेमणुक करण्यात आली असून त्याचे मार्फत हा विभाग वसुली करुन अवैध दारु विक्रेत्यांकडे डोळेझाकपणा करीत असल्याचे बोलल्या जात असून शासनाने एक मोर्शी येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय काढून घ्यावे, अन्यथा त्यांचेवर कारवाही करण्याची मागणी होत आहे.

> “ यासंदर्भात ठाणेदार विवेक देशमुख यांचे संपर्क साधून त्यांची प्रतिक्रिया जाणुन घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कॉल रिसिव्ह न केल्याने प्रतिक्रिया मिळु शकली नाही.

# जनता इंग्लिश स्कूल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – जनता इंग्लिश स्कूल येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री आंडे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन झाली. यानंतर आंडे यांनी विद्यार्थ्यांना बाबासाहेबांचे कार्य, विचार आणि संविधाननिर्मितीतील योगदान याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले तसेच शिंगरवाडे यांनीही बाबासाहेबांच्या जीवन कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यक्रमात तृप्ती चौधरी, रुही दुपारे आणि गौरी बोकडे यांनी महापरिनिर्वाण दिनाशी संबंधित मनोगते व भाषणे सादर केली. कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या विचारांवर आधारित घोषवाक्येही सादर केली. शाळेत या दिनानिमित्त समता, शिक्षण, बंधुता आणि सामाजिक न्याय या बाबासाहेबांच्या मुल्यांचा संदेश देण्यात आला.



# राजुराबाजारातील अवैध दारु व व्यवसाय बंद करा

## ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांची पोलिस अधिक्षकांकडे मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथुन जवळच असलेल्या राजुरा बाजार येथे ग्रामपंचायतच्या ठरावानुसार अवैध दारू विक्री बंद करण्यात आली होती. तब्बल ७ महिन्यांपासून ही अवैध दारु विक्री बंद होती परंतु पुन्हा अवैध दारु विक्री सुरु झाल्यामुळे ती विक्री तातडीने बंद करावी, अन्यथा आमरण उपोषणाला बसण्याचा ईशारा अशी मागणी ग्रामपंचायतच्या वतीने जिल्हा पोलिस अधिक्षकांकडे एका निवेदनाव्दारे देण्यात आला आहे.




गावकऱ्यांच्या वतीने सरपंच निलेश धुर्वे यांनी जिल्हा पोलिस अधिक्षक यांना दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे की, ग्रामपंचायत कार्यालय राजुरा बाजार या परिक्षेत्रामध्ये खुलेआम दारु विक्री सुरु आहे. विशेष म्हणजे दारु पिणाऱ्यांसाठी पुर्ण व्यवस्था करण्यात येते. वरुड येथील दारु दुकानातून पुर्ण तालुक्यात भर दिवसा दारुच्या पेटया पुरविल्या जातात तसेच बऱ्याच पान टपरीवर सुध्दा वरली मटका लिहीला जातो, राजुरा बाजार येथील आठवडी बाजारमध्ये ५ ते ६ लोक वरली मटका लिहीतात, असे अवैध व्यवसाय चालवत असताना प्रत्येक महिन्याला प्रत्येक अवैध धंदे करणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले जातात परंतु ही कारवाही तात्पुरत्या स्वरुपाची असते, बीट जमादाराला याबददल तोंडी विचारणा केली असता आम्ही कारवाही केली असे सांगतात व अवैध व्यवसाय करणाऱ्यांना अभय देतात, त्यामुळे वरील परिस्थितीचा विचार करुन अवैध व्यवसायक कायमस्वरुपी बंद करण्यात यावे व गावातील वातावरण शांततामय होण्यासाठी सहकार्य करावे अन्यथा आम्हाला आमरण उपोषणाला बसण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असा ईशाराही राजुराबाजार येथील सरपंच निलेश धुर्वे व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

### वरुड आणि शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशन क्षेत्रात

# अल्पवयीन मुलांच्या अपहरण घटनांमध्ये वाढ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – वरुड आणि शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशन क्षेत्रात गेल्या काही दिवसांपुसन अपहरणांच्या गुन्हांची नोंद मोठ्या प्रमाणात झाली असून यात कुटुंबीयांची नाराजी किंवा प्रेमात फुस लावुन पळुन गेल्याच्या सर्वाधिक घटना आहेत. अशीच घटना नुकतीच तालुक्यातील कुरळी येथे घडली आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असुन या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी किरण पुंडलीकराव दंडाळे (४६), रा.कुरळी, ता.वरुड यांची मुलगी वय १५ वर्ष ६ महीने हीने घरातील कपाटातुन ५०० रुपये घेतले. या कारणावरुन फिर्यादी किरण यांच्या पत्नीने रागावुन दापदपट करुन दोन, तीन चापटा मुलीला मारल्या. वरुन मुलगी हीने ५०० रुपये परत केले व त्यांनतर ती रागावुन पुन्हा शाळेत निघुन गेली परंतु सायंकाळी ५.३० वाजता पावेतो ती घरी परत आली नाही. तिचा आजुबाजुला, शाळा, गावात व नातेवाईकांकडे शोध घेतला परतुं कोठेही मिळुन आली नाही. तीच्या अजानतेपणाचा कोणीतरी फायदा घेवुन तिला फुस लावुन पळवुन नेले आहे.

या प्रकरणी फिर्यादी किरण पुंडलीकराव दंडाळे (४६), रा.कुरळी, ता.वरुड यांचे तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञात अरोपीविरुध्द भांदवि १३७ (२), बी.एन.एस.२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड पोलिस करीत आहे.

# बीडमध्ये बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांना प्रशासनाचा दणका, ४०० कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार : १८ कर्मचारी निलंबित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**बीड** – जिल्हा परिषदेतील सुमारे ४०० कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगात्वाची आता थेट रुग्णालयांमध्ये तपासणी केली जाणार आहे. त्यामुळे बनावट दिव्यांग किंवा कमी दिव्यांग असताना अधिक प्रमाणाचे प्रमाणपत्र मिळिवलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार असणार आहे. आत्तापर्यंत जिल्हा परिषदेतील १८ कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

तुकाराम मुंडे यांनी दिव्यांग कल्याण आयुक्ताचा पदभार घेतल्यानंतर राज्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिव्यांग प्रमाणपत्र असलेल्या कर्मचाऱ्यांच्या तपासणीचे आदेश दिले होते. त्यानुसार बीड जिल्ह्यात तपासणी मोहीम हाती घेण्यात आली. यावेळी ४०० कर्मचाऱ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. बीड जिल्हा परिषदेमध्ये बोगस दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांवर प्रशासनाने दणका देत १८ कर्मचाऱ्यांसह १४ शिक्षकांसह निलंबित केले. मुख्य सचिव तुकाराम मुंडे यांच्या आदेशानंतर जिल्ह्यातील प्रत्येक विभागातील दिव्यांग लाभधारकांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येत आहे.

